ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १३ एप्रिल, १९६० | अंक १५

## विविध माहिती

**भारताची आर्थिक प्रगति**—जागतिक बँकेचे सहा जणांचें एक प्रतिनिधी मंडळ सध्यां भारताचा दौरा करीत आहे. भारताच्या आर्थिक परिस्थितीची सर्वसामान्य पहाणी करणें हा दौऱ्याचा हेतु आहे. प्रतिनिधी मंडळाचे पुढारी मि. हॉफमन् ह्या विषयासंबंधानें बोलतांना म्हणाले कीं दोन वर्षांपूर्वीच्या मानानें हल्लीं भारतामधील आर्थिक जीवन खूपच गतिमान झालेलें आहे.

**रशिअन वकिलातीची इमारत**—परदेशीय राज-प्रतिनिधींच्या चाणक्यपुरी ह्या दिल्ली येथील वसाहतींत रशिआनें आपल्या वकिलातीसाठीं स्वतंत्र इमारत बांधली आहे. सध्यां रशिअन वकिलातीचे निरनिराळे विभाग शहरांत वेगवेगळ्या ठिकाणीं आहेत. आतां ते सर्व एकत्र येतील. इमारत बांधण्या-साठीं १·२ कोटी रुपये खर्च आला आहे.

**नेपाळमधील सिमेंटचा कारखाना**—नेपाळ व चीन ह्यांच्या दरम्यान झालेल्या आर्थिक साह्याच्या करारास अनुसरून चीन नेपाळला एक सिमेंटचा कारखाना बांधून देणार आहे. कारखाना रोज ३५० टन सिमेंट निर्माण करील, अशा बेतानें बांधण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी २ कोटी रुपये भांडवल लागेल असा अंदाज आहे. कारखाना दोन वर्षांत पूर्णपणें बांधून होईल.

**तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा आराखडा**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा आराखडा चालू महिनाअखेर पुरा होईल व मे महिन्याच्या सुमारास तो प्रसिद्ध करण्यांत येईल. त्यानंतर राज्य सरकारांशीं तपशीलवार विचारविनिमय करून ऑगस्ट-सप्टेंबरपर्यंत तो कायम करण्यांत येईल. म्हणजे अखेरचा मसुदा १९६० च्या शेवटीं तयार होईल.

**पाहुण्यांसाठी शाकुंतलाचा प्रयोग**—इजिप्तचे प्रेसिडेंट नासर भारताच्या दौऱ्यावर असतांना दिल्ली येथील हिंदी नाट्य-संस्थेनें केलेला शाकुंतलाचा प्रयोग त्यांना दाखविण्यांत आला. मात्र प्रयोगाचें स्वरूप बदलण्यांत येऊन त्याला नृत्यनाट्याचा साज चढविण्यांत आला होता. ह्याच प्रसंगीं अरबी भाषेतील कुराणाची एक प्रत त्यांना भेट म्हणून देण्यांत आली.

**फ्रान्सचा दुसरा अणुबाँब**—सहारा वाळवंटांतील स्फोट करण्याच्या ठिकाणीं फ्रान्सनें आपल्या दुसऱ्या अणुबाँबचा स्फोट केला. पहिल्या अणुबाँबचा स्फोट फेब्रुआरी महिन्यांत करण्यांत आला होता. दुसऱ्या स्फोटाचा हेतु फ्रान्सला विमानां-तून नेतां येण्यासारखे छोटे अणुबाँब तयार करतां येतात कीं नाहीं, तें पहाण्याचा होता. ह्या प्रयोगांत फ्रान्स यशस्वी झाल्याचें सांगण्यांत येत आहे.

**हातमागाच्या कापडाची निर्यात**—भारतांत तयार होणाऱ्या हातमागाच्या कापडाला परदेशाची बाजारपेठ मिळविण्यासाठी एक व्यापारी प्रतिनिधी मंडळ पूर्व व पश्चिम आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलें आहे. एडन येथील व्यापाऱ्यांशींहि मंडळानें ह्याबाबत बोलणीं केलीं. आफ्रिकेंतील बाजारपेठांतून जपानी कापडाशीं स्पर्धा करावी लागत असे. पण अलीकडे ही स्पर्धा कमी झाली आहे.

**जगजेत्या शिकंदरची कबर**—अलेक्झांड्रिआ शहरांतील एका चौकांत जगजेत्या शिकंदरची कबर आहे असा पुरावा एका ग्रीक लेखकाला सांपडल्याची वार्ता आहे ह्या लेखकाच्या कुटुंबांत असलेल्या प्राचीन कागदपत्रावरून ही जागा निश्चित करण्यांत आली आहे. चौकांत लवकरच उत्खनन चालूं होणार आहे. शिकंदर खिस्तशकापूर्वी ३२३ सालीं तापानें मरण पावला.

**औद्योगिक कलहांत तडजोड**—बेलवंडी साखर कारखाना आणि कारखान्याकडे उसाच्या लागवडीसाठी ज्यांच्या जमिनी खंडानें आहेत ते शेतकरी ह्यांच्या दरम्यान दर एकरी खंडाबद्दल वाद चालू होता. हा वाद तडजोडीनें मिटला आहे. कारखान्या-कडे दीर्घ मुदतीसाठी खंडानें असलेल्या प्रत्येक एकर जमिनी-साठी ३० रुपये देण्याचें कबूल करण्यांत आलें आहे.

**उटकमंड येथील कारखाना**—उटकमंड येथें कच्ची फिल्म तयार करण्याचा एक कारखाना फ्रेंच कंपनीच्या सहकार्यानें काढण्यांत येत आहे. कारखाना उभारण्यासाठी ४॥ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. पण, एकूण खर्च ७ कोटींपर्यंत जाण्याचीहि शक्यता आहे. प्रत्यक्ष उत्पादनास १९६२ मध्यें प्रारंभ होईल.

**रेल्वेच्या नौकरासाठी गाळे**—रेल्वे बोर्डानें कमी पगार असणाऱ्या रेल्वेच्या नौकरांसाठी १०,००० नव्या बिऱ्हाडाच्या जागा बांधण्यास मंजुरी दिली आहे. जागा बांधण्याचें काम चालू आर्थिक वर्षांतच हातीं घेण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ५·६८ कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीला सुमारें ५५,००० जागा बांधून पुऱ्या होतील.

**अहमदाबादमधील हिंदी भवन**—गुजरात राष्ट्रभाषा प्रचार समितीनें अहमदाबाद येथें बांधलेल्या हिंदी भवनाच्या इमारतीचें उद्घाटन नुकतेंच झालें. ह्या इमारतीसाठी २ लाख रुपये खर्च आला आहे. गुजरातमध्यें दरसाल सुमारें ६०,००० विद्यार्थी निरनिराळ्या हिंदी भाषेच्या परीक्षांना बसतात.

## 'नॉन-रेसिडेंट' कंपन्यांचें उत्पन्न

### पोस्टामार्फत पैसे धाडण्याचा परिणाम

### (मुंबई हायकोर्टाचा निवाडा)

केशव मिल्स बडोदें संस्थानांत पेटलाद येथें कापड तयार करून विकत असे. बराच माल ब्रिटिश हद्दींत विकला जाई. त्यावर जो नफा होई, तो ब्रिटिश हद्दींत मिळविलेला नसल्यानें आणि कंपनी ही ब्रिटिश हद्दींत नसल्यानें (नॉन-रेसिडेंट कंपनी असल्यानें) ब्रिटिश इंडियांत तिचेवर प्राप्तीकर आकारण्यांत येणार नाहीं, असें तिचें म्हणणें होतें. करआकारणीच्या १९४२-४३ सालविषयीं हा प्रश्न होता. कंपनी चेक, हुंड्या व ड्राफ्ट ह्याप्रमाणें पेटलाद येथें विक्रीचे पैसे मागवीत असे. ओगले ग्लास वर्क्स लि. च्या प्रकरणांत सुप्रीम कोर्टानें असें स्पष्ट म्हटलें आहे, कीं विकणारानें खरेदीदाराला 'तूं खरेदीची किंमत चेक, हुंडी किंवा ड्राफ्टचे स्वरुपांत पोस्टानें पाठव' असें सांगितलें असेल तर पोस्ट ऑफिस हें त्याचें एजंट बनतें आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतून चेक, ड्रॉफ्ट किंवा हुंडी पोस्टानें धाडली कीं, विकेत्याला ब्रिटिश हिंदुस्थानांत पैसे मिळाले, असेंच ठरतें. केशव मिल्सनें 'मिल्सकडे पैसे पाठवा' असें खरेदीदारांना सांगितलें होतें; 'पोस्टानें पाठवा' असें म्हटलें नव्हतें. तथापि, चेक, ड्राफ्ट किंवा हुंड्या पोस्टानेंच पाठविल्या जाणार हें उभय पक्षानें गृहीतच धरलें होतें; त्याचप्रमाणें घडतहि होतें.

मुंबई हायकोर्टापुढें हा प्रश्न आला असतांना, वरील कारणांसाठी केशव मिल्सला ब्रिटिश हिंदुस्थानांतच रकमा मिळाल्या असें धरलें. ६,७१,७३५ रु. अशा रीतीनें मिळाल्याचें हायकोर्टानें हुकुमांत म्हटलें; पेटलाद मिल्सच्या उत्पन्नांपैकी कांहीं उत्पन्न ब्रिटिश हिंदुस्थानांत मिळाल्याचें अशा रीतीनें सिद्ध झालें. त्यावर ब्रिटिश हिंदुस्थानांत प्राप्तीकर द्यावा लागेल.

---

## कंपन्यांना व त्यांच्या डायरेक्टरांना दंड

चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई, च्या कोर्टांत मार्च, १९६० मध्यें कंपनी कायद्याखालीं २३ प्रकरणें निकालांत काढण्यांत येऊन ३,६७० रु. दंड वसूल करण्यांत आला. आठ कंपन्या व त्यांचे २७ डायरेक्टर ह्यांना कंपन्यांची वार्षिक सभा न भरविल्याबद्दल दंड करण्यांत आला. सहा कंपन्या व त्यांचे १८ डायरेक्टर ह्यांना कंपन्यांच्या सभांना ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सादर न केल्याबद्दल दंड झाला. दोन कंपन्या व त्यांचे आठ डायरेक्टर ह्यांना वार्षिक रिटर्न वेळेवर न पाठविल्याबद्दल दंड केला गेला. एका लिक्विडेटरला लिक्विडेशनबाबत तक्ते न धाडल्याबद्दल दंड भरावा लागला.

---

## दारिद्र्याचे पायीं आईनें अपत्यांना नदींत फेकलें

कैलाश्वरी नांवाच्या एका बाईनें आपल्या चार अपत्यांपैकी दोघांना दिल्लीच्या यमुना ब्रिजवरून नदींत सोडून दिलें. अन्नासाठी मुलांचें रडणें तिला असह्य होऊन तिनें हा मार्ग पत्करला. मुलांना नदींतून बाहेर काढून इस्पितळांत पोंचविण्यांत आलें; तेथें तीं सुधारत आहेत. आई अटकेंत असून तिचेवर खुनाचा आरोप ठेवण्यांत आला आहे. बाकीची दोन मुलें तिच्याबरोबरच आहेत. तिचा पति गुरगाव येथें १०० रु. पगारावर नोकर आहे. गुरगांवहून ती दिल्लीला मुद्दाम गेली होती.

---

## तरत्या प्रदर्शनांतील कुप्रदर्शन

आपल्या मालाच्या प्रचारासाठी तरंगतीं प्रदर्शनें भरविण्याची योजना आखण्यांत आली आहे आणि त्याचप्रमाणें "ज्योति" ह्या आगबोटीवर बेहरिन येथें किनाऱ्यावर २७ व २८ मार्च रोजीं प्रदर्शन भरलें होतें. मालाची निवड आणि मांडणी उत्कृष्ट होती, पण गैरव्यवस्था मात्र जाणवली. सुमारें ५,००० लोकांनीं "ज्योति" वर जाऊन प्रदर्शन पाहिलें. त्यांचें स्वागत करण्यास बोटीवर कुणीच नव्हतें; मालाची माहिती देण्यासाठी कुणाचीच योजना नव्हती; प्रेक्षकांनीं दिसेल तेवढें पहावें! प्रेक्षकांच्या शंका आणि चौकश्या ह्यांना उत्तरें मिळण्याची सोय नव्हती. चांगल्या प्रकाशाचा अभाव, शिवण्याच्या यंत्रांवरील आणि पंख्यांवरील धूळ, इत्यादिमुळें चांगल्या मालाचाहि प्रभाव पडणें अवघड झालें. बोटीवर श्रमपरिहारासाठी खाद्य-पेयांसाठी दुकान उघडलेलें नव्हतें. ह्या दुकानाच्या विक्रींतून प्रदर्शनाचा थोडातरी खर्च भागला असता.

---

## ला. इं. कॉर्पोरेशनच्या रोखे खरेदीला दलाल कशासाठी?

"लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन रिझर्व्ह बँकेकडून रोखे विकत घेते, ते दलालांच्या मार्फत. दलालांच्या मध्यस्तीऐवजीं सरळ बँकेकडून खरेदी कां करण्यांत येत नाहीं?" अशा एका प्रश्नाला लोकसभेंत उत्तर देतांना अर्थमंत्रि श्री. देसाई म्हणाले, कीं अशा रीतीनेंच रोखे विकण्याचा रिझर्व्ह बँकेचा आग्रह असतो. ही दलाली बंद करतां आली तर मी पहातों, असेंहि ते म्हणाले. ला. इं. कॉर्पोरेशन आणि रिझर्व्ह बँक दोन्ही सरकारी नियंत्रणाखालींच आहेत.

---

## पेनिसिलिनच्या उत्पादनांत वाढ; किंमतींत घट

पेनिसिलिनची किंमत आणखी वीस टक्क्यांनीं कमी केल्याचें पिंपरी येथील हिंदुस्थान ॲंटिबायॉटिक्स लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एस. टी. राजा ह्यांनीं जाहीर केलें आहे. गेल्या वर्षी ३०% नें किंमत कमी केली होती. १९५९-६० मध्यें पिंपरीच्या फॅक्टरीनें ३·२ कोटी मेगा युनिटस पेनिसिलिनचें उत्पादन केलें; १९५८-५९ मध्यें २·५२ कोटी मेगा युनिटसचें उत्पादन झालें होतें. १९५९-६० मध्यें विक्रीपासून ३·१४ कोटी रु. मिळाले. फॅक्टरीच्या उत्पन्नांतूनच स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनाची तयारी करण्यांत येत आहे.

## एकाच कमिटीवर पति-पत्नीची निवड

ओरिसा असेंब्लीच्या पब्लिक अकौंटस् कमिटीच्या निवडणुकींत धेंकानलचे राजे शंकरदेव आणि त्यांची राणी हीं दोघेंहि निवडून आलीं आहेत. कमिटीच्या एकूण सभासदांची संख्या नऊ आहे.

---

## इंडियन बँकेची पुणें शाखा नव्या प्रशस्त जागेंत गेली

दि इंडियन बँक लि. ची पुणें शाखा मोगल बिल्डिंग, ७३४ बुधवार, लक्ष्मी रोड, येथील प्रशस्त जागेंत गेली असून तेथें दि. ११ पासून काम सुरू झालें आहे.

---

## युनियन बँकेची कोल्हापूर येथें शाखा

युनियन बँक ऑफ इंडियाची कोल्हापूर शाखा दि. १४ एप्रिल रोजीं लक्ष्मीपुरीमध्यें सुरू होणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १३ एप्रिल, १९६०





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## लोकशाहीवरील आर्थिक जबाबदाऱ्या

भारताच्या लोकसभेचे अध्यक्ष श्री. अनंतशयनम अय्यंगार ह्यांनीं अहमदाबादमध्यें लास्की इन्स्टिटयूटमध्यें बोलतांना लोकशाही शासनव्यवस्थेवर पडणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्यांचें व तत्संबंधित इतर विषयांचें विवरण केलें आहे. त्यांच्या भाषणाचा विषय 'लोकशाहीला असणारे धोके' असा होता. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, लोकशाही शासनाला आणि स्वातंत्र्याला जर आर्थिक गाभा निर्माण करण्यांत आला नाहीं तर लोकशाहीची पद्धतच कोलमडून पडल्याशिवाय राहणार नाहीं. कोणत्याहि प्रकारची लोकशाही असो, ती ज्या देशांत राज्य करीत असेल त्या देशांतील लोकांची भूक आणि उपासमार तिनें थांबविलीच पाहिजे. नाहीं तर ती फार काळ राज्य करूं शकणारच नाहीं. लोकशाहीच काय पण इतर कोठलीहि शासनपद्धतीसुद्धां वरील प्रश्नांच्या सोडवणुकीशिवाय टिकूं शकणार नाहीं. लोकशाहीवर अधिष्ठित असणाऱ्या कोणत्याहि सरकारला लोकमताची कदर नेहमीं केलीच पाहिजे. ह्या बाबतींत ब्रिटनमधील लोकशाहीचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवण्यासारखें आहे. ब्रिटनमध्यें पार्लमेंटच्या जागेसाठीं होणाऱ्या पोट-निवडणुकींत व्यक्त होणारी लोकमताची दिशा तर ध्यानांत घेतली जातेच; पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या निवडणुका होतात त्यांच्या निकालाचाहि लोकमताच्या अभिप्रायाच्या दृष्टीनें विचार करण्यांत येतो. लोकशाही यशस्वी होण्यास एकाच पक्षाच्या हातीं एकसारखी सत्ता राहून चालणार नाहीं. निदान दोन सुसंघटित पक्ष देशांत असणें जरूर आहे. पण, त्याचबरोबर राजकीय पक्षांचा बुजबुजाटहि असतां कामा नये. त्यामुळें स्थिर राजवटच अशक्य होते.

---

## तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम आणि औद्योगिक शांतता

अखिल भारतीय कारखानदार संघटनेची वार्षिक परिषद दिल्ली येथें दोन दिवस भरली होती. ह्या परिषदेंत देशांतील औद्योगिक जीवनासंबंधीं कांहीं ठराव मंजूर करण्यांत आले. त्यांपैकीं कामगार व कारखानदार ह्यांच्यासंबंधीं करण्यांत आलेला ठराव विशेष महत्त्वाचा आहे. ह्या ठरावांत असें सुचविण्यांत आलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत कामगार व कारखानदार ह्यांच्यांत औद्योगिक शांतता पाळण्याचा करार करण्यांत यावा. उभयपक्षांनीं आपआपल्या मध्यवर्ती संघटनांचा विचार घेतल्याशिवाय उद्योगधंदे थांबतील असें कोणतेंहि कृत्य करूं नये. कामगारांनीं संपाचा आश्रय करूं नये व कारखानदारांनीं टाळेबंदी करूं नये. आणखी एका ठरावानें कारखान्यांवर बसविण्यांत येणाऱ्या अप्रत्यक्ष करांबद्दल चिंता व्यक्त करण्यांत आली आहे. कारखान्यांतून जो पक्का माल बनविण्यांत येतो त्यावर बसविण्यांत येणाऱ्या अप्रत्यक्ष कराच्या पातळीसंबंधीं एका चौकशी मंडळाची मागणी ह्या ठरावांत करण्यांत आली आहे. अशा प्रकारच्या करांनीं उत्पादनावर अनिष्ट परिणाम होणार नाहीं ह्याविषयीं दक्षता घेण्याचीहि विनंति करण्यांत आली आहे. अप्रत्यक्ष करांच्या वाढत्या बोजामुळें वस्तूंच्या उत्पादनाच्या किंमतींत वाढ होत जाते आणि त्याचा परिणाम ग्राहकांवर होतो असें सुचवून ठरावांत सामान्य आर्थिक परिस्थितीविषयीं चिंता व्यक्त करण्यांत आली आहे. भारतासारख्या गरीब ग्राहकांच्या देशांत कारखान्यांवरील अप्रत्यक्ष करांचा उद्योगधंदे, व्यापार व रोजगाराच्या संधि ह्यांच्यावर विपरीत परिणाम होतो ह्याची सरकारनें दखल घ्यावी, असें म्हटलें आहे.

---

## कॅनडाकडून अन्नधान्यें मिळण्याची शक्यता

भारताचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील लवकरच अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. भारतामधील अन्नधान्याच्या किंमतीच्या चढउतारावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूनें सरकारनें ५० लाख टन अन्नधान्याचा सांठा करण्याची एक योजना आंखली असून ती पार पाडण्यासाठीं अमेरिकेकडून कितपत साह्य मिळूं शकेल हें पहाण्यासाठीं श्री. पाटील तिकडे जात आहेत. अन्नधान्याचा सांठा केल्यानें किंमतीवर नियंत्रण राखणें शक्य होईल आणि कांहीं अनपेक्षित आपत्ति ओढविल्यास तिला तोंड देणेंहि शक्य होईल. अमेरिकेप्रमाणेंच कॅनडाकडूनहि भारताला अन्नधान्याचा सांठा करण्याच्या कामीं मदत होण्याचा संभव आहे. अमेरिकेचा दौरा संपल्यावर कॅनडाकडून मिळू शकणाऱ्या मदतीची कल्पना घेण्यासाठीं श्री. पाटील कॅनडालाहि जाणार आहेत. अमेरिकेकडून मिळणारें अन्नधान्य पब्लिक लॉ ४८० प्रमाणें मिळणार आहे. कॅनडाकडून मिळणारे अन्नधान्य कोणत्या पद्धतीनें घेण्यांत यावें ह्याविषयीं सध्यां वाटाघाटी चालू आहेत. कॅनडाकडून मिळणारें कांहीं धान्य देणगीच्या स्वरूपांतच मिळण्याचा संभव आहे. पण, बाकीच्या धान्याविषयीं निराळी पैशाची व्यवस्था करावी लागेल. येत्या कांहीं महिन्यांतच कॅनडाकडून २० लाख टन धान्य आणण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. हें धान्य योग्य रीतीनें सांठविण्याची व्यवस्था भारतांत आहे. अन्नधान्याच्या सांठवणीची आणखी व्यवस्था करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. मध्यवर्ती सरकारच्या बांधकाम खात्यानें ह्या कामासाठीं आपली एक स्वतंत्र संघटनाच उभारली आहे. अन्नधान्याच्या सांठवणीच्या गरजांप्रमाणें बांधकाम खातें काम करील.

---

**कुलाबा जिल्ह्यांतील वीजपुरवठा**—मुंबई राज्याचे नियोजन व उद्योगमंत्री श्री. वानखेडे ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुलाबा जिल्ह्यांतील वीजपुरवठ्याच्या योजनेचा अंतर्भाव करण्यांत आला आहे. तथापि परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें सर्व जिल्हाभर विजेचा पुरवठा करणें आजच शक्य होणार नाहीं.

## ब्रिटिश बँकांचे नफे वाढले

गेल्या वर्षी ब्रिटिश बँकांनीं दिलेल्या कर्जांत प्रचंड वाढ झाली; बँकांच्या जिंदगीपैकी कर्जेच सर्वांत किफायतशीर असतात. ठेवींतहि मोठी वाढ झाली, ती मुख्यतं करंट खात्यांत; ठेवींवरील व्याजाचा सरासरी दर ३·३८% चा २% झाला. पगारवाढीमुळें व्यवस्था–खर्च बराच वाढला, तो भरून येण्याइतपत वरील घटनेमुळें उत्पन्न वाढलें नाहीं. कमिशनचें उत्पन्न खूप सुधारलें; परदेशांतील धंद्यानेंहि चांगली कमाई केली. पर्सनल इन्स्टॉलमेंट कर्जे आणि हायर परचेस कर्जे ह्यांतील वाढ महत्त्वाची ठरली; अर्थात् बँकांच्या एकूण व्यवहाराचे मानानें हा व्यवहार बेताचाच आहे.. बहुतेक बँकांनीं १९५९ अखेरचा नफा दाखविण्याचें धोरण बदललें; कारण सातांपैकी सहा बँकांनीं रोखीनें नवें भांडवल विकलें होतें आणि त्यावर चांगलें डिव्हिडंड मिळेल असें आश्वासन दिलें होतें. मिडलंड बँकेनें अपेक्षेपेक्षा २% जास्त दिलें; म्हणजे तिच्या डिव्हिडंडचा दर १७% झाला. १९५८ मध्यें तिनें १३½% डिव्हिडंड दिलें होतें. वेस्टमिन्स्टर बँकेचा नफा इतर सगळ्या बँकांपेक्षा कमी वाढला; तिनें १% च्या ५/६ इतकी डिव्हिडंडमध्यें वाढ केली. मिडलंड बँकेच्या नफ्यांत ३०% वाढ दिसून आली. नव्या भांडवलावरील डिव्हिडंडच्या मोठ्या रकमेमुळें, डिव्हिडंड खातीं खर्च होणारी रक्कमहि बरीच वाढली.

### प्रमुख ब्रिटिश बँकांचे नफे व त्यांची वांटणी
### ( ००० पौंड )

| | निवळ नफा | | डिव्हिडंड % | |
|---|---|---|---|---|
| | १९५८ | १९५९ | १९५८ | १९५९ |
| बार्कलेज | ३३४५ | ४१४४ | ९·० | १०·० |
| लॉइड्स् | २७२८ | ३४२५ | १०·० | १२·० |
| मिडलंड | २९३४ | ३८२६ | १३·५ | १७·० |
| नॅश. प्रॉव्हि. | २२३६ | २८४१ | २०·० | १७·० |
| वेस्टमिन्स्टर | २०७० | २५०६ | १०·० | १०·८ |
| मार्टिन्स | १०५१ | ११६१ | १६·० | १६·० |
| डिस्ट्रिक्ट | ७३८ | ८६४ | १७·० | १५·५ |
| वे. डेकॉन्स | ४७४ | ५४१ | १७·३ | २०·० |

### ‘ बिग फाइव्ह ’ बँकांचे नफे

| | १९५८ (पौंड) | १९५९ (पौंड) | वाढ % |
|---|---|---|---|
| बार्कलेज | ३३,४५,४११ | ४१,४४,४७० | +२३·९ |
| लॉइड्स | २७,२७,५३५ | ३४,२४,६१४ | +२५·६ |
| मिडलँड | २९,३४,०३९ | ३८,२६,३८० | +३०·४ |
| नॅ. प्रॉव्हि. | २२,३६,४२६ | २८,४०,९७० | +२७·० |
| वेस्टमिन्स्टर | २०,६९,७४७ | २५,०६,१०१ | +२१·१ |
| | १,३३,१३,१५८ | १,६७,४२,५३५ | +२५·६ |

### रशिआकडून खनिज तेलाची आयात

भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान १९६० सालीं करावयाच्या व्यापारासंबंधी नुकत्याच वाटाघाटी करण्यांत आल्या. ह्या वाटाघाटींत रशिआंतून खनिज तेलाची आयात करण्याबद्दल तत्त्वतः मान्यता देण्यांत आली आहे. भारत रशिआकडून ह्या वर्षी सुमारें १·८ लाख टन तेल आयात करील असा अंदाज आहे. तेलाची आयात किती करावयाची हें ठरलें असलें तरी त्याच्या किंमती, तेल प्रत्यक्ष आयात करण्याचें वेळापत्रक आणि इतर तपशील अद्याप ठरावयाचा आहे. ह्या बाबींबद्दल सध्यां उभयतां देशांत बोलणीं चालू आहेत. तेलाच्या आयातीसंबंधी रशिआशीं दीर्घ मुदतीचा करार करण्याचा भारत सरकारचा विचार आहे. सार्वजनिक मालकीच्या कंपनीकडून तेलाची आयात करण्यांत येईल व त्याचें वाटपहि त्याच कंपनीमार्फत करण्यांत येईल. प्रथम सुमारें १० लाख टन तेल आयात करण्यांत येईल. नंतर हळुहळु आयात वाढविण्यांत येईल आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस २५ लाख टन तेल आयात करण्यांत येईल. तेलाची सांठवण करण्याची सोय मर्यादित असल्यामुळें सरकार ह्या बाबतींत सावकाशीनें वाटचाल करीत आहे. सध्यां फक्त ६ लाख टन तेल सांठविण्याची सोय सरकारजवळ आहे. सरकारच्या संरक्षण खात्याच्या तेलाच्या गरजा आणि सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांच्या तेलाच्या गरजा भागविण्यासाठी मुख्यतः ही आयात करण्यांत येत आहे. सध्यां देशाला दरसाल सुमारें ६० लाख टन तेल लागतें. त्या दृष्टीनें पहातां सरकारतर्फे होणाऱ्या तेलाच्या आयातीमुळें तेलाच्या व्यापारांतील नेहमींच्या व्यवहारावर फारसा परिणाम होणार नाहीं.

### “ टाइम ” साप्ताहिकाचा जागतिक प्रसार

“ टाइम ” ह्या सुप्रसिद्ध अमेरिकन साप्ताहिकाच्या दर आठवड्यास १२१ देशांतून ३०,००,००० प्रती खपतात आणि त्या १,२५,००,००० लोकांच्या वाचनांत येतात. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं “ टाइम ” नें आंतरराष्ट्रीय प्रकाशनास प्रारंभ केला, आणि ठिकठिकाणच्या सैनिकांना साप्ताहिक पुरविलें. युद्ध-समाप्तीचे सुमारास “ टाइम ” २१ आवृत्त्या काढीत असे. विमानांतून टपाल पाठविण्याच्या सोई वाढल्यानंतर आवृत्तींची संख्या कमी करणें शक्य झालें आणि आतां खालीलप्रमाणें आवृत्त्या निघतात. प्रत्येक आवृत्तींत मजकूर बहुतेक तोच असतो; जाहिरातींत मात्र फरक असतो.

| आवृत्ति | प्रती |
|---|---|
| यु. स्टे. आवृत्ति | २४,८०,००० |
| लॅटिन अमेरिका | ६९,००० |
| पॅसिफिक | १,००,००० |
| अॅटलँटिक | १,६०,००० |
| कॅनडा | २,१५,००० |
| जागतिक खप | ३०,२४,००० |

### अमेरिकेंतील मोटारी

अमेरिकेंत १९५९ मध्यें ६०,२६,५०० नव्या मोटारी नोंदण्यांत आल्या. त्यांची वर्गवारी अशी :—

| | |
|---|---|
| फोर्ड | १४,६८,४५१ |
| शेवरोलेट | १४,१६,०७६ |
| प्लिमथ | ३,८८,७७२ |
| पॉंटिॲक | ३,८१,८२७ |
| रँबलर | ३,६२,८७४ |

## मध्यवर्ती व्यापार व उद्योगखातें
### १९५९–६० मधील प्रगति

औद्योगिक उत्पादनांत आणि निर्यातीच्या उत्पन्नांत विशेष वाढ, यंत्रें तयार करणाऱ्या धंद्यांच्या विकासावर भर आणि सरकारी तसेंच खाजगी क्षेत्रांत अनेक नव्या योजनांची आखणी या मध्यवर्ती व्यापार व उद्योगखात्याच्या १९५९ मधील कामकाजांतील महत्त्वाच्या घटना होत.

या खात्याचा १९५९–६० चा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. परकीय चलनविषयक परिस्थिति बिकट होती तरीहि त्या कारणास्तव औद्योगिक उत्पादनास खीळ बसूं नये याकडे लक्ष देण्यांत आलें असें या अहवालांत म्हटलें आहे. या वर्षांत औद्योगिक उत्पादनाची पातळी १९५८ पेक्षा बरीच वाढली. मागील वर्षाशीं तुलना करतां १९५९ च्या पहिल्या दहा महिन्यांत औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १०·४ अंशांनीं वाढून १४९·३ वर गेला. १९५८ व ५७ मधील वाढ २ अंशांपेक्षाहि कमीच होती. प्रत्यक्षांत पाहतां हें उत्पादन औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक सुचवितात त्यापेक्षाहिं जास्त आहे. कारण त्यांत १९५१ नंतर उत्पादनास प्रारंभ झालेल्या (पेनिसिलीनसारख्या) वस्तूंचा समावेश करण्यांत आलेला नाहीं.

#### अनेक धंद्यांतील उत्पादनांत वाढ

या वर्षांत साखर धंद्यास लागणारी यंत्रसामग्री, डिझेल इंजिनें, मशीन टूल्स, मोटारगाड्या, सल्फ्युरिक ॲसिड, लोखंड व पोलाद, ॲल्युमिनियम, सुपर फॉस्फेट, सोडा ॲश, सिमेंट व कागद या धंद्यांतील उत्पादनांत विशेष वाढ झाली आहे. आज देशांत १,६२,००० टनांच्या पोलादी वस्तु व १२,००० वाघिणी व त्यांचे सांगाडे तयार होत आहेत. १९५९ मध्यें साखरकारखान्यांस लागणारी अडीच कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री, ४ कोटी रु. किंमतीची मशीन टूल्स तयार झाली. त्याचप्रमाणें सध्यां ३०,००० डिझेल इंजिनें, २० लाख बॉल-बेअरिंज, ३४,००० मोटारगाड्या, १७५ डिझेल रोड रोलर, ६,००,०००हॉर्स पॉवरचे इलेक्ट्रिक मोटर्स, १० लाख केव्हीएचे पॉवर ट्रॅन्सफॉर्मर इ. तयार होत आहेत.

पोलादाच्या वाढत्या प्रमाणावर पुरवठा झाल्यावर इंजिनिअरिंग धंद्यांचें उत्पादन झपाट्यानें वाढेल. सध्यां देशांत १६,००० टन ॲल्युमिनियम, ७,५०० टन तांबें, ६०,००० टन लोहित मॅंगेनीज तसेंच शिसें, जस्त व ॲन्टीमनीचेंहि कांहीं प्रमाणांत उत्पादन होत आहे. कॉस्टिक सोडा, सोडा ॲश, सल्फ्युरिक ॲसिड, सिमेंट व कॅल्शियम कार्बाइड यांची उत्पादनशक्ति बरीच वाढली असून हायड्रोजन पेरॉक्सॉइड, औद्योगिक आणि खाणकामांत लागणारीं स्फोटकद्रव्यें, अमोनियम नायट्रेट, ॲसिटोन यांसुद्धां अनेक नव्या वस्तूंचें उत्पादन झालें आहे.

#### अवजड उद्योगधंद्यांचा विकास

ब्रिटिशांच्या सहकार्यानें प्रस्थापित होत असलेल्या भोपाळ येथील अवजड विद्युत् सामग्री कारखान्याची चांगली प्रगति झाली आहे. या योजनेची पहिली अवस्था आतां पूर्ण झाली असून योजनेचा उरलेला भाग झपाट्यानें पुरा करण्याचें तसेंच या योजनेच्या विकासाकरितां तरतूद करण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे. या ठिकाणीं मोठे ट्रॅन्सफॉर्मर्स, स्विच गिअर्स, टरबाइन्स व जनरेटर्स, ट्रॅक्शन मोटर्स, त्याचप्रमाणें अनेक प्रकारचे विद्युतविषयक अवजड व मोठें साहित्य तयार होईल.

रशियाच्या सहकार्यानें प्रस्थापित होत असलेल्या रांची येथील अवजड यंत्रसामग्री योजनेनुसार पोलाद कारखान्यास लागणाऱ्या यंत्रसामग्रीचा पुरवठा होईल. या योजनेची उत्पादनशक्ति दरवर्षी ४५,००० टनांच्या यंत्रसामग्रीवरून ८०,००० टनांवर नेण्याचें ठरलें आहे. या कारखान्यांत संपूर्णपणें उत्पादनास प्रारंभ झाल्यानंतर दहा लाख टन शक्तीच्या पोलाद कारखान्यास लागणाऱ्या बिगर-विद्युत् यंत्रसामग्रीचें येथें उत्पादन करणें शक्य होईल.

या दोन मोठ्या योजनांशिवाय खाणकाम यंत्रसामग्री योजना, एक अवजड मशीन टूल योजना, एक हेवी स्ट्रक्चरल योजना व आणखी दोन अवजड विद्युतविषयक योजना यांसुद्धां अनेक यंत्रनिर्मिति योजनांस भारत सरकारनें ताबडतोब अंमलबजावणीसाठी नियोजन मंडळाचा सल्ला घेऊन मंजुरी दिली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत शक्य तितक्या लवकर या योजनांनुसार उत्पादनास प्रारंभ व्हावा असा त्यामागील हेतु आहे. त्याचप्रमाणें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अनेक खतकारखाने, औषधी योजना, सेन्द्रीय रासायनिक धंद्याकरितां लागणारा मूलभूत कच्चा माल तयार करणारा कारखाना व सिनेमाची व एक्स् रे फिल्म तयार करणारी योजना इत्यादि सुरू होतील. याप्रमाणें सदर योजनांनुसार उत्पादन होऊं लागल्यावर परदेशांतुन होणाऱ्या आयातीचें प्रमाण बरेंच कमी होऊन परकीय चलनाचीहि मोठीच बचत होईल.

विविध प्रकारच्या औद्योगिक यंत्रसामग्रीच्या तसेंच यंत्र-उभारणीधंद्यांच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनास परवाने मिळण्यासाठी केल्या जाणाऱ्या अर्जांची संख्या अलीकडच्या काळांत सतत वाढत असल्याचें अहवालांत म्हटलें आहे.

#### परकीय व्यापार

निर्यातींत वाढ करण्यासाठी योजलेल्या अनेक उपायांमुळें या वर्षांत निर्यात व्यापारापासून १९५८ पेक्षा १०·२ टक्के अधिक म्हणजे ६२६ कोटी रुपये उत्पन्न झालें. अनेक प्रकारच्या वस्तूंच्या निर्यातींत वाढ झाली. यांत सुती कापड, कमावलेलीं कातडीं व चामडीं, तयार कातडी माल, सिमेंट, बरड लोखंड यांचा समावेश होतो. मात्र या काळांत चहा, कच्चा कापूस, तंबाकू व कांहीं वनस्पति तेलें यांच्या निर्यातीपासून होणारें उत्पन्न घटलें आहे.

#### आयात

एकोणीसशें एकुणसाठ मध्यें एकूण ८६९ कोटी रु. किंमतीच्या मालाची आयात झाली. १९५८ चा हा आंकडा ८६४ कोटी रुपये होता. त्यांतल्या त्यांत या वर्षीं अन्नधान्यांच्या आयातींत वाढ झाली आहे.

#### कंपनी कायद्याची अंमलबजावणी

या वर्षांत मुदत संपलेल्या व्यापारकरारांचें नूतनीकरण करण्यांत आलें. त्याचप्रमाणें कांहीं देशांशीं नवे करारहि झाले. छोट्या उद्योगधंद्यांकडे सरकारनें या वर्षांत खास लक्ष दिलें. नियोजित १०० औद्योगिक वसाहतींपैकीं ९६ वसाहतींस मंजुरी देण्यांत आली आहे. या वर्षांत एकूण १० कोटी रु. किंमतीच्या खादीचें उत्पादन झालें. सरकारनें त्यासाठी ३ कोटी रु. मदत व ५० लाख रुपयांचें कर्ज दिलें. कंपनी कायदा कारभार-खात्याचें काम या वर्षीहि समाधानकारकपणें चालूं होतें. मध्यवर्ती गृहखात्याच्या खास पोलीस दलानें या खात्याच्या

सरकारनें कंपन्यांतील लबाडीचे व्यवहार शोधून काढण्यासाठी एक खास तुकडी स्थापिली आहे. १९५६ च्या कंपनी कायद्यांतील निरनिराळया कलमांचा भंग केल्याबद्दल जानेवारी ते ऑक्टोबर १९५९ पर्यंत ६४७ कंपन्या व त्यांतील अधिकारी यांवर एकूण २,४१० खटले भरण्यांत आले. १९५९ च्या पहिल्या ११ महिन्यांत १८ नव्या सरकारी कंपन्या स्थापन झाल्या आहेत. ३० नोव्हेंबर १९५९ रोजीं एकूण ४३९.५७ वसूल भांडवलाच्या ११३ सरकारी कंपन्या चालू होत्या. जानेवारी ते नोव्हेंबर १९५९ पर्यंत एकूण १५९ कोटी रु. अधिकृत भांडवलाच्या १२८४ नव्या कंपन्यांची नोंद झाली असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे.

### एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंडावर पावणेचार टक्के व्याज

मध्यवर्ती मजूर खात्याचे संयुक्त चिटणीस श्री. के. एन्. सुब्रम्हण्यम् यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंडाच्या मध्यवर्ती विश्वस्त मंडळाच्या बैठकींत, या फंडाच्या सदस्यांच्या रकमेवर १९६०-६१ मध्यें पावणेचार टक्के दरानें व्याज देण्याची शिफारस भारत सरकारला करण्यांत आली. ज्या मालकांकडून कामगारांची ह्या फंडाची संपूर्ण वा कांहीं रकम भरण्यांत आलेली नाहीं अशा प्रकरणीं कामगारांस साहाय्य करण्यासाठीं स्पेशल रिझर्व्ह फंडाला आर्थिक मदत देण्याच्या प्रश्नाचा त्रिपक्षीय परिषदेनें विचार करावा अशीहि शिफारस करण्यांत आली. एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड संघटनेचा १९६०-६१ चा अर्थसंकल्पीय अंदाज मंडळानें संमत केला. सुमारें ७,२०० कारखान्यांतील अंदाजीं २६.४६ लक्ष कामगारांना आज ह्या फंडाचा लाभ मिळत आहे.

### रेल्वे उतारूंच्यासाठी लॉकर्सची सोय

उतारूंच्यासाठी निरनिराळया मोठ्या स्टेशनांवर ठेवण्यासाठी ३० सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था करण्यांत येणार आहे. ह्या शहरांत थोड्या दिवसांसाठी येणाऱ्या उतारूंना हीं लॉकर्स नाममात्र भाड्यानें दिलीं जातील. तीस सेफ डिपॉझिट लॉकर्सपैकी प्रत्येकी पांच नॉर्थर्न, सेंट्रल आणि ईस्टर्न रेल्वेजना दिलीं जातील; तीन साउथ सदर्नला मिळतील आणि नॉर्थ ईस्टर्न व नॉर्थ ईस्ट फ्रॉंटिअर रेल्वेला प्रत्येकीं दोन मिळतील. झोनल रेल्वेजनीं हे लॉकर्स कोणत्या स्टेशनांत ठेवावयाचें, तें ठरविण्याचें आहे.

### अशोक हॉटेलला तिसऱ्या वर्षींहि तोटा

दिल्ली येथील सरकारी मालकीच्या अशोक हॉटेलला तिसऱ्या वर्षींहि नुकसान आलें आहे. नुकसानीचा आकडा मात्र कमी झाला आहे. सध्यां हॉटेलच्या हिशेबाचें वर्ष ऑक्टोबर–सप्टेंबर आहे, तें एप्रिल–मार्च करण्यांत आलें आहे. १९५६–५७ मध्यें अशोक हॉटेलला ३७.७६ लक्ष रु. तोटा आला होता. १९५७–५८ मधील तोटा १५.७६ लक्ष रु. होता आणि ऑक्टोबर १९५८ ते मार्च १९५९ ह्या सहामाहींतील तोट्याची रकम २.२२ लक्ष रु. भरली. १९५९–६० मध्यें हॉटेल फायदा दाखवूं लागेल, अशी अपेक्षा आहे.

**केरळच्या मंत्र्यांचे पगार**—केरळ राज्याच्या मंत्र्यांचे पगार व विधानसभेच्या सदस्यांचे भत्ते वाढविण्यासाठी नवीन सरकार कायद्यांत दुरुस्ती करणार आहे. मंत्र्यांना दरमहा ५०० ऐवजीं ८०० रु. पगार मिळणार असून सदस्यांना दरमहा १५० रु. ऐवजीं २०० रु. भत्ता देण्यांत येणार आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

## कामाचे दिवस फुकट जाण्याचें प्रमाण घटलें

काम बंद पडल्यामुळें कामाचे जे दिवस फुकट जातात त्याबाबतींत १९५९ मध्यें बरीच घट झाली हें भारतांतील १९५९ मधील औद्योगिक संबंधांबाबचें एक उल्लेखनीय वैशिष्ट्य असल्याचें मध्यवर्ती मजूर व रोजगार खात्याच्या वार्षिक अहवालांत म्हटलें आहे. काम बंद पाडण्यांत पर्यवसान झाल्यामुळें १९५८ मध्यें ७८ लक्ष माणूस—कामाचे दिवस फुकट गेले होते तर १९५९ मध्यें हें प्रमाण कमी होऊन सुमारें ५६ लक्ष माणूस—कामाचे दिवस फुकट गेले.

स्वयंस्फूर्त पायावर औद्योगिक लोकशाही स्थापन करण्यासाठी आणि औद्योगिक क्षेत्रांत शांतता नांदण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या शिस्तसंहितेचा उल्लेख करून अहवालांत म्हटलें आहे कीं, ही संहिता अंमलांत आल्यापासून गेल्या दीड वर्षांत तिला स्पृहणीय आणि उत्तेजक यश लाभलें आहे.

### वेतन

त्रिपक्षीय वेतनमंडळें अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत असें ह्या अहवालांत म्हटलें असून याचा पुरावा म्हणून मळे आणि ताग या दोन प्रमुख निर्यात धंद्यांनींहि वेतनमंडळाची मागणी केली आहे व तीं स्थापन करण्यासाठी भारत सरकार उपाय योजीत आहे या गोष्टीचा उल्लेख केला आहे. सुती कापड आणि सिमेंट धंद्यांच्या वेतनमंडळांच्या शिफारशी त्यावरील सरकारच्या निर्णयांसह प्रसिद्ध करण्यांत आल्या असून, साखर कारखान्यांच्या वेतनमंडळाचा अहवाल सप्टेंबरमध्यें प्रसिद्ध होण्याची अपेक्षा आहे. दरम्यानच्या काळांत साखर कारखान्यांतील कामगारांसाठी हंगामी पगारवाढ देण्याची शिफारस मंडळानें केली असून ही शिफारस सर्व कारखान्यांनीं लागू केल्याचें निरनिराळया राज्य सरकारांकडून यासंबंधी आलेल्या अहवालांवरून दिसून येतें.

वेतनमंडळांनीं कायदेशीर स्वरूप देण्याबाबतचा कायदा करण्यासंबंधी अहवालांत म्हटलें आहे कीं, स्थायी मजूर समिती ह्या सूचनेशीं सहमत नाहीं; संबंधित पक्षांनींच वेतनमंडळाचे एकमुखी निर्णय अंमलांत आणावे. तथापि, असें झालें नाहीं तर ह्या शिफारशींना कायदेशीर स्वरूप देण्यासाठी योजावयाच्या उपाययोजनांबाबत सरकारला विचार करतां येतील.

### कामगार राज्य विमा योजना

देशांतील निरनिराळया ८६ केंद्रांतील १४·४३ लक्ष कामगारांना कारभार राज्य विमा योजनेचे फायदे मिळत आहेत. या वर्षी ह्या योजनेची व्याप्ति वाढविण्यांत येऊन विमेदार कामगारांच्या कुटुंबियांनाहि तिचा लाभ मिळूं लागला. यामुळें आणखी ११·८४ लक्ष व्यक्तींना ह्या योजनेचा लाभ मिळाला.

### प्रॉव्हिडंट फंड

सन १९५२ ची एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड योजना सुरुवातीला ६ कारखान्यांना लागू करण्यांत आली होती. आज आणखी ३३ कारखान्यांना आणि धंद्यांना ही योजना लागू करण्यांत आली असून, दरवर्षी ह्या फंडाच्या सदस्य संख्येंत वाढ होत आहे. मार्च १९५९ च्या अखेरीस संख्या २५·४ लक्ष होती. सध्यां ५० किंवा त्याहून अधिक कामगार असलेल्या कारखान्यांस लागू करण्यांत येणारी योजना २० कामगार असलेल्या कारखान्यास लागू करण्याचा विचार असून त्यासंबंधीचें विधेयक तयार करण्यांत येत आहे.

त्याखेरीज, कोल माइन्स प्रॉव्हिडंट योजनेचा लाभ ऑक्टोबर १९५९ च्या अखेरीपर्यंत १,१८१ कोळसा खाणींतील १२ लाखांहून अधिक कामगारांस मिळाला.

### हितसंवर्धन आणि कल्याण

कोळसा खाण मजूर कल्याण निधि संघटनेच्या कार्याचा उल्लेख करून अहवालांत म्हटलें आहे कीं, कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या हितसंवर्धनासाठी १९५७–५८ मध्यें दरडोई १७ रु. खर्च झाला होता तर १९५८–५९ मध्यें हा खर्च २० रु. वर गेला. १९५९–६० मध्यें ह्या फंडाचें उत्पन्न १ कोटी ७६ लक्ष रु. वर जाईल असा अंदाज असून, त्यांपैकी १ कोटी, ७० लक्ष रु. हितसंवर्धन व घरबांधणी योजना यांवर खर्च करण्यांत येतील.

### रोजगार

रोजगाराच्या समस्येचा उल्लेख करून अहवालांत म्हटलें आहे कीं, दुसऱ्या योजनेंत ६५ लक्ष व्यक्तींना रोजगार मिळवून देण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें होतें. पहिल्या चार वर्षांत ४५ ते ५० लक्ष लोकांना रोजगार मिळेल असा अंदाज असून बाकीच्यांना रोजगार मिळण्यासाठी पुढील वर्षी संधि निर्माण करण्यांत येईल.

नोकरी न मिळालेल्या व्यक्तींची पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांत तुंबून राहिलेली संख्या वाढूं नये म्हणून तिसऱ्या योजनेंत उपाययोजना करण्यांत येऊन जास्तींत जास्त लोकांना रोजगार मिळवून देण्याकडे लक्ष पुरविण्यांत आलें पाहिजे असें अहवालांत म्हटलें आहे.

### उद्योगविनिमय केंद्रें

सन १९५९ च्या अखेरीस भारतांतील उद्योगविनिमय केंद्रांची संख्या २१२ होती व त्यांच्या नोंदणी बुकावर १४,२०,९०१ अर्जदारांचीं नांवें होतीं.

### कारागिरांना शिक्षण

दुसरी योजना सुरू होण्यापूर्वी असलेल्या निरनिराळया औद्योगिक शिक्षणसंस्था व केंद्रें यांमध्यें १०,५३४ जणांना शिक्षण मिळण्याची सोय होती. दुसऱ्या योजनेंत ही संख्या २०,९०० जागांचें लक्ष्य ठरविण्यांत आलें परंतु कारागिरांची जरूरी लक्षांत घेतां आणखी ३०,००० जागांचें लक्ष्य संकल्पिण्यांत आलें.


### संयुक्त व्यवस्थापक मंडळें

व्यवस्थापक आणि कामगार यांच्या संयुक्त मंडळांनीं कारभार चालविण्याची योजना ५० कारखान्यांनीं मान्य केली. परंतु प्रत्यक्षांत २३ कारखान्यांनींच ही योजना अंमलांत आणली. अशा मंडळांचे कार्याची माहिती मिळण्यासाठी, त्याचें मूल्यमापन करण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रीय आणि राज्यीय पातळीवर एक कार्यक्षम यंत्रणा उभारण्याचा भारत सरकारचा इरादा असल्याचें अहवालांत म्हटलें आहे.

---

**बेकार स्त्रियांना काम.**— हैदराबाद व सिकंदराबाद येथील बेकार स्त्रियांना काम देण्यासाठी आंध्र राज्य सरकारनें २ लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्या रकमेचा उपयोग करून हातसडीचे तांदूळ तयार करण्याचीं सहा केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. ह्या केंद्रांतून निदान २०० स्त्रियांना तरी काम पुरविता येईल.

# STURDY
*Elegence*



# STABILITY
*Precision*


Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means an immeasurable loss of money, time and work.

*We stand for ....*

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

**For success**



**THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES**
GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Phone : 6640
Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.

PARKERSON

## कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : – श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.

## 'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.